स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :-२५ मे, २०२३

जळगाव. दि. २५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्सच्या दोन विद्यार्थ्यांची टिएमईआयसी, माधपूर, हैद्राबाद येथील कंपनीत निवड झाली आहे.

केंद्रिय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षामार्फत विद्यापीठातील भौतिकशास्त्र प्रशाळेतील एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्सच्या विद्यार्थ्यांकरीता टिएमईआयसी, इंडस्ट्रीयल सिस्टीम्स इंडिया प्रा. लि. माधपूर, हैद्राबाद या कंपनीच्या परिसर मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. या मुलाखती अंतर्गत एकुण बारा विद्यार्थ्यांच्या चाचणी व मुलाखती कंपनीने घेतल्या. त्यामधून निकीता पवार आणि यशल नारखेडे या दोन विद्यार्थ्यांची निवड कंपनीने केली आहे. या विद्यार्थ्यांचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी अभिनंदन केले. या मुलाखती आयोजनासाठी समन्वयक प्रा. रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ. उज्वल पाटील, डॉ. जसपाल बंगे, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी व्यवस्थापन केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारीकरीता